# अक्षर वाङ्मय

ऑक्टोबर - नोव्हेंबर - डिसेंबर २०२०

वर्ष : अकरावे अंक : दुसरा



संपादक

डॉ. नानासाहेब सूर्यवंशी

Scanned by CamScanner

आर. एन्. आय. फॉर इंडिया नवी दिल्ली
र. नं. - MAHMAR-36829-2010

ISSN - 2229-4929
UGC Approved and Peer
Reviewed Journal

# अक्षर वाङ्मय

वर्ष : अकरावे अंक : दुसरा

ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०२०

संपादक

**डॉ. नानासाहेब सूर्यवंशी**

कार्यकारी संपादक

**डॉ. शिवाजीराव देशमुख**

मार्गदर्शक

**डॉ. अरुण प्रभुणे**

संपादक मंडळ

**डॉ. बाळासाहेब लबडे** **डॉ. दीपक चिद्दरवार**

**डॉ. रत्नाकर बेडगे** **डॉ. संदीप सांगळे**

प्रकाशक : सौ. रेखाताई नानासाहेब सूर्यवंशी, प्रतीक प्रकाशन,
'प्रणव', रुक्मे नगर, थोडगा रोड, अहमदपूर ४१३५१५.

**साहित्य व वर्गणी पाठविण्याचा पत्ता :** डॉ. नानासाहेब सूर्यवंशी
'प्रणव', रुक्मे नगर, थोडगा रोड, अहमदपूर, ता. अहमदपूर
जि. लातूर ४१३५१५. भ्रमणध्वनी : ९४२३६५५८४१
E-mail : suryawanshinanasaheb67@gmail.com.

**वार्षिक वर्गणी :** रु. ५००/- **द्विवार्षिक वर्गणी :** रु. ९००/-
**पंचवार्षिक वर्गणी :** रु.२०००/- **अंकाचे मूल्य :** रु. १२५/-

* महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.
* या अंकातील लेखांतून व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक, संपादक मंडळ, प्रकाशक व मुद्रक सहमत असतीलच असे नाही.

Scanned by CamScanner

# अनुक्रम


- संपादकीय ---------------------------------------- ४
- मुखपृष्ठाविषयी ---------------------------------------- ६
- माडगूळ परिसरात ---------------------------------------- ३३
  **प्रा. इंद्रजित भालेराव**
- व्रतस्थ लेखक- भास्कर चंदनशीव ------------------------ ५९
  **रा. रं. बोराडे**
- कुसुमाग्रजांची सामाजिक कविता ------------------------ ६५
  **डॉ. अविनाश सांगोलेकर**
- धार्मिक सुधारणाविषयक विचार व मराठी नाटक ------------ ७४
  **डॉ. दत्ता पाटील**
- मानवतावादी मूल्यभानाची मांडणी : 'भूमिकांचा ऐवज' ---------- ८३
  **डॉ. कीर्तिकुमार मोरे**
- 'सात पाटील कुलवृत्तांत' : कादंबरीतील प्रमुख व्यक्तिरेखा -------- ८८
  **डॉ. सोमनाथ दडस**
- महानगरीय समाज जीवनाची मूलगामी चिकित्सा -------------- ९९
  **डॉ. शिवाजी एंडाईत**
- वर्तमान जीवनातील वास्तव चित्रण ---------------------- १०४
  **डॉ. नानासाहेब सूर्यवंशी**
- 'बहादूर थापा आणि इतर कविता' : सामाजिक जाणिवा -------- १११
  **डॉ. नाना झगडे**
- पुन्हा एकदा कब्रीतला समाधिस्त ------------------------ ११९
  **डॉ. कोमल ठाकरे**
- जगण्यावर निष्ठा असलेली कविता : 'आभाळ अंतरीचे' --------- १२७
  **डॉ. यादव सूर्यवंशी**
- कविता ---------------------------------------- १३३
  **डॉ. केशव सखाराम देशमुख, शशिकांत हिंगोणेकर**
- 'अक्षर वाङ्मय' चे नूतन व नूतनीकरण केलेले वर्गणीदार -------- १३८
- संपादक मंडळ ---------------------------------------- १४०

# 'बहादूर थापा आणि इतर कविता' सामाजिक जाणिवा

- डॉ. नाना झगडे

'बहादूर थापा आणि इतर कविता' हा कवी संतोष पद्माकर पवार यांचा कवितासंग्रह साधना प्रकाशनाने जून २०१५ साली प्रकाशित केला. या कवितासंग्रहातील कविता 'साधना' साप्ताहिकाच्या अंकातून प्रसिद्ध झाल्या होत्या. यापूर्वी कवी संतोष पद्माकर पवार यांचे 'भ्रमिष्टाचा जाहीरनामा'(२००३),'पिढीपेस्तर प्यादेमात' (२००८) हे कवितासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. 'बहादूर थापा आणि इतर कविता' या कवितासंग्रहातील सर्व कविता मुक्तछंदातील दीर्घकविता आहेत. या कवितांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे या व्यक्तिचित्रणात्मक कविता आहेत. नव्वदोत्तरी मराठी कवितेतील वैशिष्ट्यपूर्ण कवितासंग्रह म्हणून या कवितासंग्रहाची नोंद घ्यावी लागेल.

"सामाजिक वास्तवाशी सहकंप होण्याची शक्ती ज्याच्या प्रतिभेत असेल त्याच कवीच्या हातून उत्कृष्ट सामजिक जाणिवेची कविता निर्माण होण्याची शक्यता आहे. जाणती सहानुभूती, सूक्ष्म निरीक्षणशक्ती, किंवा स्वाभाविक कुतूहल या गुणांच्या जोरावर अशा कवितेचा प्रपंच मांडणे शक्य असले तरी तेवढ्याने त्यात खरा प्राण निर्माण होणार नाही. कवीला होणाऱ्या सामाजिक वास्तवाच्या साक्षात्कारात जेव्हा एखाद्या सेंद्रिय अनुभवाची अनिवार्यता उत्पन्न होते, तेव्हाच या कवितेची नदी जिवंतपणे धडधडू लागते. पण सामाजिक वास्तवाशी सहकंप होणे म्हणजे समाजाने स्वीकारलेल्या नैतिक कल्पनांचे, समाजाला प्रिय असणाऱ्या अशा आकांक्षांचे किंवा समाजातील विशिष्ट वर्गाच्या हितसंबंधाचे यांत्रिक प्रतिनिधित्व स्वीकारणे नव्हे. उलट जिवंत सामाजिक जाणीव ही काही वेळा असली यांत्रिक प्रतिनिधित्वापेक्षा सृजनशील विरोधातच अधिक प्रकट झालेली दिसून येते."[१] गो. वि. करंदीकर यांनी काव्य आणि सामाजिक जाणीव यातील संबंध स्पष्ट म्हटले आहे. त्यांच्या वरील संदर्भीय साहित्यविचारातून समाज,



Scanned by CamScanner